# SUMMERY OF MINOR RESEARCH PROJECT

# SPONSORED BY U.G.C

# SPIRITUAL THOUGHTS OF MAHATMA GANDHI


Principal Investigator

Dr.Sau. Pushpa S. Tayde

Principal

**LOK MAHAVIDYALAYA, WARDHA**

**BACHELOR ROAD, WARDHA (M.S.)**



UNIVERSITY GRANTS COMMISSION

BAHADUR SHAH ZAFAR MARG

NEW DELHI-110002

## SUMMARY OF THE PROJECT

**प्रस्तावना व संषोधन पध्दती** या प्रकरणात विषय निवडण्याची कारणे, विषयाचे महत्व, विषयाची उॊष्टे, सामग्री संकलन,विश्लेषण व प्रकरणाची रचना यासंबंधी माहिती देण्यात आली आहे.

**गांधीजींचे चरीत्र** गांधीजींना जीवनाच्या विविध क्षेत्रात प्राप्त झालेल्या सिध्दी पाहून सारे जग आश्चर्य चकीत होते पण हे ते कसे प्राप्त करू शकले हे जाणण्याची इच्छा सर्वांनाच आहे.गांधीजींच्या जीवनात घडलेल्या महत्वाच्या घटनांचा आढावा चरीत्रामध्ये घेण्यात आला आहे.

**हिंदू धर्म** भारतातील अधिक लोक हिंदू धर्म मानतात. तो धर्म त्यांच्या आचरणात उतरला आहे. आध्यामिक दृष्टीने हिंदु धर्माचे परमसाध्य म्हणजे मोक्ष आणि सर्व व्यापी विष्वात्म्यामध्ये जिवात्माचा पुर्ण लय होतो. धार्मिक दुष्टीने एकच ईष्वर ठरला आहे. ते हिंदु धर्माचे मुख्य लक्षण आहे. आणि नैतिक दृष्टीने आत्मविसर्जन आणि त्याच्याच अनुषंगिक गुण सहिष्णूता हा सर्वात महत्वाचा गुण आहे. सहिष्णूता हे हिंदु धर्माचे पुर्विपासूनचे एक तत्व आहे. जीवमात्राची हत्या करण्याचे टाकून त्यांच्या सहिष्णुता बाळगल्याने प्रेमाचे उच्चतम स्वरूप प्रगट होते.

**महात्मा गांधीजीची गुरू षिष्य परंपरा व सिध्दपुरूषांचा सहवास** 1942 च्या आंदोलनापुर्वी महात्मा गांधींनी भगवान नित्यानंदांची भेट घेतली. भगवान नित्यानंदांनी हताश निराश झालेल्या गांधीजींना दुध व केळाचा प्रसाद दिला व राम बाण चालविण्याचा आदेश दिला.

महात्मा गांधी गोलमेज परीषदेला उपस्थित राहण्यासाठी इंग्लंडला गेले तेव्हा भगवान नित्यानंदांनी काननगड येथे अखंड दगडात गोलमेज परीषदेसारखी बैठक तयार केली.इतकेच नव्हे तर गांधीजींनी तिकडे केलेले रोजचे भाषण इकडे जनतेला ऐकवत.नंतर तेच वर्तमानपत्रातून प्रकाशित होत असे. महात्मा गांधीजीची गुरू शिष्य परंपरा बाबाजी महाअवतार, श्री. लाहिरी महाशय, श्री. युक्तेश्वर गिरी, श्री. योगानंद व महात्मा गांधी अशी आहे. परमहंस योगानंद दि. 27 ऑग. 1935 वर्धेला आले. त्यांची व महात्मा गांधीची भेट झाली. 29 आगॅ. 1935 ला योगानंदानी महात्मा गांधीना व त्यांच्या सोबत असणाऱ्या कार्यकत्यांना क्रिया योगाची दिक्षा दिली. क्रिया योग हा शक्तीपात दिक्षा देण्याचा एक प्रकार आहे. पहिल्याच दिवशी गांधींना ध्यानामध्ये सुंदर अनुभव आले.त्याचे वर्णन योगी कथामृतामध्ये आले आहे.

महात्मा गांधीना श्रीधर विष्णु परांजपे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,फुईजी गुरूजी, रायचंद या सारख्या सिध्द पुरूषाचा सहवास लाभला.

**षरीर व आत्म्याविषयीचे विचार** शरीर म्हणजे आपल्याला ज्या ठिकांणी परमेश्वराची भेट होते. त्यांचा साक्षात्कार होतो असे स्थान. अशी सर्व धर्माची मान्यता आहे. त्याला प्रभुचे गृह असे नामाभिधान दिलेले आहे. आपल्याकडे ते भाडयाने वापरायला दिले असून त्याचे भाडे म्हणजे फक्त प्रभू गुणाचे संकिर्तन. या भाडे पटयामध्ये आणखीन एक शर्त आहे की, या घराचा आम्ही वाईट उपयोग करता कामी नाही. आतुन आणि बाहेरून आम्ही ते स्वच्छ राखले पाहीजे. आणि जसे ते आमच्या कडे येतांना होते. तसेच्या तसे योग्य वेळी ते आम्ही प्रभुला दिले पाहीजे.

आत्म्यापेक्षा देह जास्त प्रीय होता कामा नये. जो आत्म्याला जाणतो तो देहापासून वेगळा आहे. हे जाणतो.

**प्रार्थनेचे महत्व** प्रार्थनेचे महात्मा गांधीच्या जीवनात तेच महत्व होते. जे व्यक्तीसाठी प्राण वायुचे असते. कृती विना प्रार्थना ही पोपटपंची होय. उपोषण व प्रार्थना मनोभावे व धार्मिक वृतीने केले तर त्याचे आष्चर्यकारक परीणाम दिसून येतात. प्रार्थनेचा अर्थ ईश्वराकडे सांसारिक सुखासाठी किंवा स्वार्थासाठी केलेली याचना नव्हे.ती आर्त आत्म्याचे आक्रंदन आणि तिचा आवाज ईश्वराच्या दरबारात ऐकू

गेल्याशिवाय राहात नाही.जेव्हा एखादी व्यक्ती किंवा राष्ट्र संकटात सापडते तेव्हा त्यांच्या वेदनेची जाणीव प्रार्थनेतून प्रकट होते.

**रामनाम** रामनाम किंवा असे एखादे पवित्र नाव आत्मशुध्दीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना आधार देण्यासाठी आणि ईश्वराकडुन सरळसरळ आर्शिवाद घेण्यासाठी आवश्यक आहे. रामनामाने मनुष्यामध्ये अनासक्ती आणि समता येते.जेव्हा जेव्हा मनामध्ये क्षोभ होईल तेव्हा तेव्हा आपण रामनामाचे चिंतन करा. नामामध्ये शांती देण्याचे सामर्थ्य आहे हे लक्षात घ्या.हा नामजप हळूहळू करा. आपल्याला आनंदमयी शांतीचा अनुभव येईल.

**ईश्वराविषयीचे विचार** गांधीजींनी सत्य हाच परमेश्वर ही एकच गोष्ट निचित असून त्या परमेश्वरावरची आपली निष्ठा व्यक्त केली पाहीजे. जसे माझे अस्तीत्व आहे तसे ईश्वराचेही आहे असे गांधीजीचे म्हणणे होते. जेथे ईश्वर आहे तेथे सत्य आहे आणि जेथे सत्य आहे तेथे ईश्वर आहे.सत्य हेच ईश्वर आहे. सत्यापर्यंत जाण्याचा मार्ग प्रेम आहे.

**सत्याग्रह** सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह सत्याची शक्ती असा त्याचा अर्थ होय. सत्याग्रह म्हणजे निशस्त्र प्रतिकार. सत्याग्रहात तुम्ही स्वच्छेने क्लेश सोसायला तयार असले पाहिजे सत्याग्रहाचा अवलब करणाऱ्याने दुसऱ्याशी उर्मटपणे वागता कामा नये.

गांधीजी म्हणतात गीता वाचण्याचा परीणाम म्हणजे तो ग्रंथ आचरणाचा एक श्रेष्ठ मार्गदर्शक झाला. भगवत गीतेच्या वचनावरून व्देषाला प्रेमाने, असत्याला सत्याने कसे जिंकता येईल आणि हे तत्व अमलात कसे आणता येईल हे मला कळुन येते.

**एकादष व्रत** गांधीजींच्या जीवनाबद्दल व त्यांच्या साधनेविषयी माहिती प्राप्त केली असता त्यांना ही मनोबलाची शक्ती सत्याची आराधना व ईश्वरावर दृढ श्रध्दा यामुळे प्राप्त झाली.

ईश्वर सत्य आहे. हे समजून पन्नास वर्षाच्या दीर्घ सतत आणि कठीण संशोधनाअंती मी या निष्कर्षापर्यंत येवून पोहोचलो की सत्य हेच ईश्वर आहे.सत्यापर्यंत जाण्याचा मार्ग प्रेम आहे

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह। शरीर–श्रम, अस्वाद, सर्वत्र भय वर्जन ।।

सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना। ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये।।

**अहिंसा :–** अहिंसा म्हणजे आज आपण जी स्थूल अहिंसा पाहतो ती नव्हे. कोणालाही मारावयाचे नाही हे झालेंच; परंतु प्रत्येक कुविचार म्हणजे हिंसा होय. उतावळेपणा म्हणजे हिंसा; मिथ्या भाषण म्हणजे हिंसा; द्वेष हिंसा होय; कोणाचें वाईट चिंतणे म्हणजेसुध्दा हिंसाच. ज्याची लोकांना जरूर आहे ते आपल्या ताब्यात ठेवणे हीसुध्दा हिंसाच आहे. देहाला कवटाळण्याची वासना मनाने निःशेष सोडावी तेव्हाच देह शेवटी आपल्याला सोडील, ही निर्मोह अवस्था. अहिंसेविना सत्याचा शोध अशक्य आहे. अहिंसा व सत्य ही एकमेकांशी इतकी जखडलेली आहेत की जशा काही नाण्याचा दोन बाजू; किंवा गुळगुळीत चकतीच्या दोन्ही बाजू. तरीपण अहिंसेला आपण साधन म्हणावे व सत्याला साध्य. साधन आपल्या हातातील गोष्ट आहे. म्हणून अहिंसा परम–धर्म झाली.

**सत्यः–** 'सत्य' शब्द 'सत्' वरून आलेला आहे. सत् म्हणजे असणे. सत्य म्हणजे असण्याचा भाव. सत्याव्यतिरिक्त इतर कोणत्या वस्तुला अस्तित्वच नाही. परमेश्वरांचे खरे नांवच 'सत्' म्हणजे 'सत्य' आहे. म्हणून परमश्वर 'सत्य' आहे. असे म्हणण्यापेक्षा 'सत्य' म्हणजेच परमेश्वर असे म्हणणें अधिक उचित होय. त्यामुळे परमेश्वर हे नाव अधिक प्रचलित आहे व राहणारही. पण विचार केला असता 'सत्' किंवा 'सत्य' हेंच ईश्वर खरे नाव होय व हेच पूर्ण अर्थ सूचित करते. जेथे सत्य आहे तेथे ज्ञान – शुध्द ज्ञान आहेच आहे. जेथे सत्य नाही तेथे शुध्द ज्ञान शक्यच नाही. म्हणूनच ईश्वराच्या नावांबरोबर चित् म्हणजे ज्ञान हा शब्दहि जोडलेला असतो. आणि जेथे सत्य ज्ञान आहे तेथे आनंदच असणार शोक असावयाचाच नाही.

आणि सत्य शाश्वत आहे त्या अर्थी आनंदही शाश्वतच असणार. म्हणूनच आपण ईश्वराला सच्चिदानंद या नावांने ओळखित असतो.

**अस्तेय :–**अस्तेय म्हणजे चोरी न करणे. जो चोरी करतो त्याला सत्य कळतें किंवा प्रेमधर्मांचें त्याच्याकडून पालन होते असे कोणीच म्हणू शकणार नाही. तरीही असे खरे की चोरीचा दोष आपण सर्वच थोडयाबहूत अंशी जाणता अजाणता करीत असतो. परक्याची वस्तू त्याच्या परवानगीशिवाय घेणे ही तर चोरी खरीच. पण स्वतःची समजली जाणारी वस्तुही मनुष्य चोरू शकतो. जसे, बापाने आपल्या मुलाच्या न कळत, त्यांना कळू नये अशा हेतूने, गूपचूप काही खावे. आश्रमाचे कोठार हे आपले सर्वांचे आहे असे म्हणता येईल. पण त्यातून जो कोणी गुपचूप गुळाचा बारका खडाहि तोंडात टाकील तो चोर होय. एक मुलगा दुसऱ्या इसमाला माहीत असेना का. पण कसलीही वस्तु त्याच्या परवानगीशिवाय घेणे म्हणजे सुध्दा चोरीच होय. वस्तुला कोणी मालक नाही, असे म्हणून ती घेण्यामध्ये चोरी होते.

**ब्रम्हचर्य :–**ब्रम्हचर्याचा संपूर्ण आणि बिनचूक अर्थ म्हणजे ब्रम्हाकरीता शोध; ज्या अर्थी ब्रम्ह हे सर्वत्र भरले आहे त्या अर्थी चिंतनाने व त्या चिंतनातून निर्माण होणाऱ्या अंतः प्रकाषाने त्याचे ज्ञान होऊ शकेल हा प्रकाश इंद्रियावर संपूर्ण ताबा असल्याशिवाय शक्य होत नाही. म्हणून ब्रम्हचर्याचा अर्थ सर्व इंद्रियांवर सर्व ठिकाणी आणि सर्व वेळ आचार उच्चार आणि विचार यांवर ताबा हा होय. **जो पुरूष अगर स्त्री हे संपूर्ण ब्रम्हचर्य पाळते, तो संपूर्णपणे रोग मुक्त असतो. म्हणून तो किंवा ती ईष्वराच्या सानिध्यात सतत राहाते. आणि दैवतुल्य होते.** अशा प्रकारे आचार, उच्चार व विचार यांत संपूर्ण ब्रम्हचर्य पाळणे शक्य आहे. अशा प्रकारची संपूर्ण ब्रम्हचर्यावस्था मला प्राप्त झाली नाही, हे दुःखाने मला म्हणावे लागते. ती अवस्था प्राप्त होण्याकरीता मी क्षणोक्षणी धडपड करीत आहे. ती अवस्था प्राप्त होण्याची आशा मी सोडलेली नाही. मी शरीरावर ताबा मिळविला आहे. जागृतावस्थेतच्या काळात मी स्वतःचे रक्षण करू शकतो.

**अपरिग्रह/असंग्रह :–**अपरिग्रह हे अस्तेयाशी मिळते व्रत आहे असे म्हणता येईल. मुळात न चोरलेल्या वस्तूचाहि जरूरी नसतांना संग्रह करून ठेवल्याने ती चोरीच्या मालासारखी होऊन जाते. परिग्रह म्हणजे संचय किंवा एकत्र करणे. सत्यशोधक, अहिंसक परिग्रह करू शकत नाही. परमात्मा परिग्रह करीत नाही. त्याला 'हव्या वाटणाऱ्या' वस्तु तो रोजच्या रोज निर्माण करतो. म्हणून आपला जर परमात्म्यावर विश्वास असेल तर आपण समजून असावे की आपल्याला लागणाऱ्या वस्तु तो रोजच्या रोज देत असतो, देत जाईलहि. अवलियांचा, भक्तांचा, असा अनुभव आहे. रोजच्या पुरतेच निर्माण करण्याचा हा ईश्वर नियम आपल्याला माहीत नसतो, अथवा माहीत होऊनही आपण त्याचे पालन करीत नाही. त्यामुळे जगामध्ये विषमता व विषमते–पासून उद्‌भवणारी दुःखे आपल्याला अनूभवावी लागतात. धनाढय इसमाच्या घरी त्याला जरूर नसलेल्या वस्तु सांठवलेल्या असतात, अस्ताव्यस्त पडलेल्या असतात, कुजत असतात. तर इकडे त्यांच्या अभावी करोडो गोरगरीब रडत असतात, भूकी मरत असतात, थंडीने गारठत असतात. सर्वांनी आपल्यास जरूर तेवढाच संग्रह केला तर कोणालाच वाण पडणार नाही, व सर्वानाच संतोष लाभेल. आज तरी दोघांच्याही मागे भीक लागलेली आहे. कोटयाधीश असतो. तो अब्जाधीश होऊ पाहतो, आणि तेवढयावरहि त्याला संतोष होत नाही. कंगाल असतो. तो कोटयाधीश होण्याची इच्छा करतो. कंगाल इसमाला पोटापुरते मिळाले तर तेवढयाने त्याला संतोष झाला असेंहि दिसत नाही.

**शरीरश्रम :–**शरीरश्रम म्हणजे अंग मेहनत.''शरीर श्रम प्रत्येक माणसाला आवश्यक आहे.'' भगवद्‌गीतेच्या तिसऱ्या अध्यायात म्हटले आहे. यज्ञ केल्याखेरीज जो खातो. तो चोरीचे अन्न खातो, अशा तऱ्हेचा भयंकर शाप यज्ञ करणाऱ्याला दिलेला आहे. या ठिकाणी यज्ञ याचा अर्थ शरीरश्रम किंवा रोटी–श्रम हाच योग्य दिसतो. माझ्या मते तर हाच एक अर्थ शक्य आहे. ते कसेही असो हाच आपल्या या व्रताचा उगम होय. बुध्दिवादानेही आपण या सिध्दांताशी येऊन पोहचतो. मेहनत करीत नाही त्याला खाण्याचा हक्कच काय? बायबल सांगते, 'तू आपली भाकर स्वतःच्या अंगातून घाम काढून कमव व खा.' कोटयाधीशसुध्दा जर

आपल्या पलंगावर लोळतच राहिला, आणि तोंडात कोणी आणून घालील तेव्हाच खात गेला, तर त्याला फार काळ खाता यायचे नाही, त्याला अन्नाची गोडीही वाटणार नाही म्हणून तो व्यायाम वगैरे करून भूक लागेशी करतो; आणि खाण्यासाठी तर त्याला स्वतःचेच हात तोंड हलवावे लागते. जर अशा तऱ्हेने या नाही तर त्या रूपाने शारीरिक व्यायाम राव व रंक सर्वांनाच करावा लागतो, तर मग रोटी उत्पन्न करण्याचाच व्यायाम सर्वांनी का करू नये, असा प्रश्न सहजीच उद्भवतो. शेतकऱ्याला नाही कोणी हवा खायला की, व्यायाम करायला सांगत. आणि दुनियेतील नव्वद टक्क्यांहून अधिक लोकांचा निर्वाह शेतीवरच चालला आहे. त्याचे अनुकरण बाकीच्या दहा टक्क्यांनी केले तर जगात किती सुख, किती शांती व किती आरोग्य फैलावले बरे! ज्याला अहिंसेचे पालन करावयाचे आहे, सत्याची आराधना करावयाची आहे, ब्रम्हचर्याला आपण जन्मस्वभाव बनवावयाचे आहे, त्याला तर शरीर श्रम हे रामबाणप्रमाणे होते.

**अस्वाद :—** अस्वाद म्हणजे स्वाद न घेणे, स्वाद म्हणजे रूची. ज्याप्रमाणे औषध घेते वेळी आपण ते स्वादिश्ट आहे किंवा कसे याचा विचार न कराता, शरीराला त्याची जरूर आहे असें समजून ठराविक प्रमाणात खातो, त्याचप्रमाणे अन्नाविषयी समजावे. अन्न म्हणजे एकुण एक खाद्य पदार्थ. अर्थात दूध, फळे इत्यादिही अन्नामध्ये आली. औषध ज्याप्रमाणे कमी प्रमाणात घेतलें तर परिणाम करीत नाही, किंवा थोडा करते. आणि प्रमाणाबाहेर घेतले तर हानी करते, तसेच अन्नाचेंही आहे. म्हणून कोणतीही वस्तु तिची रूची घेण्यासाठी चाखणे हा या व्रताचा भंग होय. रूचकर वाटणारी वस्तु प्रमाणाबाहेर खाणे हा तर उघडच भंग आहे. यावरून लक्षात येईल की एखाद्या जिनसाची चव वाढविण्यासाठी किंवा बदलण्यासाठी किंवा वाईट चव मोडण्यासाठी त्या जिनसात मीठ घालणे हाहि व्रताचा भंग होय. परंतु अन्नामध्ये अमुक एका प्रमाणात मीठ घालणे आवश्यक आहे असे आपल्याला माहीत असेल व तदनुसार त्यामध्ये आपण मीठ घालीत असू तर तो व्रत भंग होत नाही.

**अभय / निर्भयताः—** अभय म्हणजे सर्व तऱ्हेच्या बाहय भयांपासून मुक्ती. मृत्युचे भय धनदौलत चोरीस जाण्याचे भय, कुटुंबपरिवारासंबंधीचे भय, रोगाचे भय, शस्त्रप्रहाराचे भय, अब्रुचे भय, कोणी नाराज होईल याचे भय, अशा तऱ्हेने भयाची वंशावळ वाटेल तेवढी लांबविता येईल, केवळ एका मृत्युचे भय जिंकले की सर्व भये जिंकली असे सामान्यतः म्हटले जाते. पण ते बरोबर दिसत नाही. पुष्कळ जणांनी मृत्युचे भय सोडलेले असते, पण इतर अनेक प्रकारच्या दुःखापुढे पळ काढतात, कोणी स्वतः जिवावर उदार असतात पण आप्तेष्टांचा वियोग त्यांना सहन करवत नाही. एखादा कृपया हे सर्व जाऊ देईल, प्रत्यक्ष देहावर पाणी सोडील तो खरा निर्भय.

**सर्वधर्मसमभाव :—** गांधीजी म्हणतात, ''सर्व धर्माचा अभ्यास केल्यावर मला त्यातील दृढ भाजक सापडला आहे. काही तत्वे न बदलणारी आहेत. अशी वाटतात. व अनुभवाने ती असिध्द ठरली नाहीत. तुळशीदास सारख्या भक्तांनी एका अर्ध्या काव्य पंक्तीत असे म्हटले आहे की, ''दया धर्म का मूल है'' ''सत्या शिवाय दुसरा धर्म नाही (नहि सत्यात्परोधर्मः।) ही अशीच एक शाश्वत म्हण आहे. हया वचनाचा कोणत्याही धर्माने निषेध केला नाही. शास्त्रापासून आधार घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक धार्मिक तत्वाची परीक्षा ऐरणीवर करावी आणि त्याकरीता दयेचा हातोटा वापरावा. जर ते तत्व कणखर आढळले आणि जर तुटले नाही तर ते बिनचूक आहे. म्हणून स्विकारावे.

**स्वदेषी :—** गांधीजी म्हणतात नेमस्तांना राष्ट्र वाद्यांना आणि कॉग्रेस जनांना मी असे सुचवितो की, '' त्यांनी जर आपल्या दररोजच्या वैयक्तिक उपयोगात, परदेशी किंवा हिंदी गिरण्याचे कापड टाकून देऊन फक्त खादीच वापरली आणि जर ते दररोज नियमितपणे धार्मिक वृत्तीने सूत कातू लागले आणि आपल्या कुंटुबातील मंडळीचेही मन त्याकरिता वळवू लागले, आणि जर ते आपल्या शेजाऱ्यांच्या व खादीचा वापर आणि शक्तीनुसार चरख्याचा प्रचार करू शकले, तर एका वर्षाचा आत राष्ट्राला परदेशी कापडावरील

बहिष्कार अंमलात आणता येईल. कुठल्याही सबबी खाली त्यांनी परदेशी कापड वापरू नये आणि आपल्या गिरण्यात तयार झालेले कापड हेही वापरू नये, हया दोन निषेधात मला भेदाभेद केला पाहिजे. परकिय कापडावरील बहिष्कार ही कायमची जिव्हाळयाची गरज आहे. गिरणीच्या कापडावर कायमचा राष्ट्रीय बहिष्कार घालण्याचा प्रश्नच नाही. पण केवळ हिंदी गिरण्यांना सध्याची कापडाची गरज भागविता येणार नाही. तथापि चरख्याला आणि मागाला ती भागविता येईल. पण चरख्यावरील खादी  ही अद्याप लोकप्रिय आणि सार्वजनिक व्हावयाची आहे. ती तषी होण्याकरता हिंदूस्थानातील विचार वंतांनी सुरवात केली पाहिजे म्हणून त्यांनी कापड हे खादीचेच वापरले पाहिजे.''

**अस्पृष्यता – निवारण :–** अस्पृश्यता म्हणज शिवाशीव, आणि शिवाशीव लुल्या अवयवाप्रमाणे आहे. ही धर्माच्या नावाखाली, किंवा धर्माचे सोंग आणून, धर्मामध्येच जेथे तेथे विघ्न आणीत असते, व धर्माला कलुषित करते. आत्मा जर एकच आहे, ईश्वर एकच आहे, तर मग अस्पृश्य कोणीच नाही. ज्याप्रमाणे धेडभंग्यांना अस्पृश्य लेखण्यात येते पण ते मान व करूणा यांस पात्र आहे. मृत देहाचा स्पर्श झाल्यानंतर, किंवा अंगाला तेल लावल्यानंतर किंवा हजामत केल्यानंतर किंवा करविल्यानंतर, आपण स्नान करतो ते केवळ आरोग्याचा दृष्टीने. मृत देहाचा स्पर्श झाल्यास, किंवा तेंल लावल्यास किंवा लावून घेतल्यावर कोणी स्नान करीत नसेल तर त्याला वाटल्यास घाणरेडा म्हणा; परंतु तो पापी किंवा पातकी नव्हे. एरवी आईलासुध्दा मुलाचे हगमूत काढल्यानंतर ती स्नान करीपर्यंत किंवा हातपाय धुईपर्यंत अस्पृश्य मानली तर त्यात काही वावगे नाही; पण मूल खेळता खेळता तिला शिवले तर त्याला नाही होणार विटाळ, की नाही त्याचा आत्माहि मलिन व्हायचा. पण ज्यांना आपण हलकेपणाच्या अर्थाने भंगी, धेड, चांभार इत्यादी नावांनी संबोधितो त्यांना तर जन्मतःच अस्पृश्य लेखण्यात येते. मग ते शेकडो साबण खर्च करून वर्षानुवर्षे अंग चोळून का काढीतना, वैष्णवांसारखा पोषाख का करीतना, गळयात तुळशीची माळ का घालीतना, रोज गीतापाठ का करीतना, आणि धंदा कारकुनाचा का करीतना, ते अस्पृष्य ते अस्पृष्यच. अशा तऱ्हेने जो धर्म समजला जातो, किंवा धर्म म्हणून आचरिला जातो, तो धर्म नव्हे तर अधर्मच आहे व नाशाला लायक आहे. अस्पृष्यता – निवारणाला व्रताचे स्वरूप देण्यात आपण असे मानतो की अस्पृष्यता हे हिंदुधर्माचे अंग नाही, एवढेच नव्हे तर ही हिंदूधर्मात शिरलेली घाण आहे, हा भ्रम आहे, पाप आहे व तिचे निवारण करणे प्रत्येक हिंउूचा धर्म आहे, त्याचे ते परम कर्तव्य आहे, म्हणून जो ते पाप आहे असे मानतो, त्याने त्याबद्दल प्रायश्चित म्हणून, धर्मकार्य समजून अस्पृष्य मानल्या जाणाऱ्या प्रत्येक बंधुभगिनींशी आपलेपणा जोडावा. त्यांना मनोभावाने, सेवाभावाने, स्पर्श करावा; त्या स्पर्शाने आपण पुनीत झालो असे मानावे. ' अस्पृष्यता च्या अडचणीचे निवारण करावे; आज अनेक वर्षे त्यांना चिरडून टाकण्यात आल्यामुळे त्यांच्यामध्ये जे अज्ञानादि दोष शिरले आहेत ते काढून टाकण्यास त्याने त्यांना सोशिकपणे मदत करावी; आणि असेंच करण्याविषयी इतर हिंदूची मने वळवावी; त्यांना प्रोत्साहन द्यावे.

**आत्मा एकच आहे तो प्रत्येक शरीरात वास करतो. तर मग कुणी अस्पृष्य असू शकेल का?**अस्पृष्यतेचा अर्थ समजण्यासाठी आपण प्रयत्न करू. रजस्वला स्त्री, स्मशानातून परत आलेला पुरूष, शौचाहून परत आल्यानंतर हात पाय न धुतलेला माणूस यांचा संबंध टाळाला जातो. आपल्या आई बापांच्या विषयी सुध्दा आपण या अर्थाने अस्पृष्यता पाळतो. जर रजस्वला असलेल्या आपल्या आजारी मातेची सेवा मुलाने केली नाही आणि जर तो काही काळ अस्पृष्य झाला तर तो खरेच नरकात जाईल. जे मैली वाटतात ते सर्व अंत्यज आहेत. त्यांनी जर आपले काम केल्यानंतर स्नान केले नाही तर आपण त्यांना स्पर्श केल्यास स्नान करावे. पण या व्यावहारिक कल्पनेच्या भुमिकेवर अंत्यत वर्ग निर्माण करणे त्या वर्गाला एका विशिष्ट राखीव जागी कोंडून ठेवणे जनावरांपेक्षा सुध्दा त्या समाजातील लोकांशी अधिक त्याज्य म्हणून संपर्क टाळणे ते जगतात. का मरतात. याची पर्वा न करणे त्यांच्यापुढे उष्टे किंवा नासके अन्न टाकणे,

त्यांच्या मुलांना शिक्षण नाकारणे, ते आजारी पडले असता त्यांना औषधोपचार मिळवून देण्यास मदत करणे त्यांना देवळात प्रवेश नाकारणे किंवा विहिरीवर पाणी भरू न देणे हा धर्मच असू शकत नाही. तो अधर्म आहे. या रूढी हिंदू धर्माचा आवश्यक मात्र आहेत. असे समजून आपण हिंदू धर्माचा नाश करीत आहोत. अशा प्रकारची अस्पश्यता म्हणजे आत्मा हा होय. असहिष्णूतेची ती पराकोटी आहे. प्रत्येक हिंदूने ती अस्पृष्यता नष्ट केली पाहिजे. व त्या प्रयत्नाला मेले पाहिजे. हा त्याचा आद्य धर्म आहे. याविषयी मला यात किंचितही शंका नाही.

**अस्पृष्यता निर्मुलनाचा अर्थ :–** अस्पृष्यता निर्मुलनाचा एकच अर्थ होऊ शकतो तो म्हणजे आपण हिंदूनी अस्पृष्यतेच्या पापातून मुक्त झाले पाहिजे. चार वर्ण कोणाच्या स्पर्शाला विटाळ किंवा पाप मानीत नाहीत .. ......... पण जो माणूस दुसऱ्याच्या शरीराचा स्पर्श होण्यास हरकत घेतो किंवा एखादया विशिश्ट जातीत जन्माला आला म्हणूनच कोणाला अस्पृष्य मानतो. तो निसर्गाच्या नियमाचे उलंघन करतो. करूणेचा तत्वाला आणि खऱ्या शास्त्राच्या अर्थाला बाधा आणतो. अस्पृष्यतेचा दोष आमच्यामध्ये आहे असे आपल्याला वाटतच नाही. कोणाला असेही वाटेल की हिंदू समाजाचा अलंकार म्हणून अस्पृष्यता काळजी पूर्वक जतन केली आहे. हा दोष नाहीसा करणे समाज हितचिंतकाला अवघड वाटत असतांना व्यवहार कुशल माणसांनी या सुधारणेच्या मार्गात आणखी अडचण उत्पन्न करून तिच्या प्रगतीला पायबंद घालू नये.

**गीतेतील तत्वज्ञान** भगवत गीतेतून व्देषाला प्रेमाने, असत्याला सत्याने कसे जिंकता येईल आणि हे तत्व अमलात कसे आणता येते हे कळते. क्रोधाला क्रोधाने उत्तर न देता प्रेमाने क्षमेने दिले पाहीजे.साधु बनणे म्हणजे सर्वार्थाने सदगृहस्थ बनणे होय.यज्ञ केल्यावाचून जो अन्न सेवन करतो तो चोर होय.यज्ञ याचा अर्थ असा आहे की हे शरीर लोकाच्या कल्याणासाठी परमेश्वरासाठी आहे.गीता भले करण्यासाठी हिंसा करावी असे शिकवित नाही.गीता आमच्याच अंतकरणात चाललेल्या नित्य व्दंदाचे वर्णन आहे.गीता ही तेजशक्ती आणि तमशक्ती यांच्यामध्ये भेद करते आणि त्या दोघांचे एकत्र राहाणे अशक्य असल्याचे दाखवून देते.

**(PRINCIPAL INVESTIGATOR)** **(REGISTRAR/PRINCIPAL)**

**Dr. Pushpa Subhash Tayde** **Lok Mahavidyalaya, Wardha**